# स्त्री हक्काची चळवळ आणि राजकीय प्रक्रियेतील सहभाग

**प्रा.डॉ. कुंदन डी. पिल्लेवान,** श्रीमती. सिंधुताई पोरेड्डीवार कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोगाव.
ता.जि.गडचिरोली.

---

**प्रस्तावना:-**

स्त्रियांना पुरुषाच्या बरोबरीने हक्क मिळावेत यासाठी केली जाणारी चळवळ असा सोपा व सरळ अर्थ लावला जातो. हा अर्थ काही प्रमाणात बरोबर असला तरी एवढ्या मर्यादित अर्थाने स्त्रीवादी चळवळीचा विचार करता येत नाही. या चळवळीच्य मागे सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व राजकीय कारण परम्परांची लांबलचक यादी दिसून येते. या विचारप्रणालीमध्ये व्यक्तिगत, सामाजिक,राजकीय आणि तात्विक पैलू समाविष्ट असले तरी सर्वच स्त्रीवादी दृष्टीकोनातून स्त्री–पुरुष संबंधाच्या प्रस्थापित व्यवस्थेत बदल घडवून आणण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. सामाजिक न्यायाच्या दृष्टीने स्त्रियांना स्वातंत्र्य व किमान समानतेचा दर्जा मिळवून देणे हा या विचारप्रणालीचा मुख्य उदेश आहे. स्त्रीवादी चळवळ हा शब्द इंग्रजीतील फेमिनिझम (Feminism) या शब्दापासून आलेला आहे. स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे हक्क मिळावेत अशा मतप्रणालीची चळवळ हा फेमिनिझमचा अर्थ आहे. परंतु या चळवळीला स्त्री मुक्ती चळवळ, स्त्री शक्ती चळवळ, स्त्री हक्क चळवळ,स्त्री सबलीकरण चळवळ या निरनिराळ्या नावाने संबोधिले जाते. साधारणत: स्त्रीवादाची प्रारंभिक अवस्था म्हणून ज्याला ओळखले जाते ती स्त्रीवादी चळवळ मताधिकाराच्या मुद्यावर सुरु झाली. मताधिकारासाठी स्त्रियांनी संघटीत स्वरुपात जो संघर्ष सुरु केला,त्या संघर्षातून मताधिकाराला राजकीय अधिकाराच्या स्वरुपात अधिक महत्व प्राप्त झाले. लोकशाहीतील भागीदारीचा महत्वाचा भाग म्हणून त्याला मान्यता मिळाली.

लोकशाहीच्या विकासासोबत नागरिकांच्या राजकीय सहभागाची संकल्पना अधिक व्यापक होत गेली. काळानुसार बदलणा-या लोकशाही व्यवस्थेतील नागरिकांच्या राजकीय सहभागाचे आधार काय असावेत? या प्रश्नाभोवती विचारमंथन झाले. त्यातून धर्म, वंश, जाती, वर्ण, शिक्षण,संपत्ती इ. सर्व संकुचित मुद्दे बाजूला सारून सर्वसामान्य नागरिकांना किमान पात्रतेच्या आधारावर मताधिकार दिला जावा हा विचार पुढे आला. मात्र लिंगभेदाचा प्रश्न कायमचा राहिला. प्राचीन ग्रीक नगरराज्यांच्या प्रत्यक्ष लोकशाहीपासून हा प्रश्न २० व्या शतकापर्यंत कोणत्या ना कोणत्या स्वरुपात अस्तित्वात होता. ग्रीक नगरराज्यामध्ये फक्त नागरिक असणा-या पुरुषांना राजकीय प्रक्रियेत सहभागी होता येत असे. गुलाम,स्त्रिया व परकीय व्यक्तींना नागरिकत्व दिले जात नसे. परिणामी स्त्रिया मताधिकारापासून वंचित होत्या. १७ व्या आणि १८ व्या शतकात स्वातंत्र्य, समता,बंधुता या राजकीय मुल्ल्यावर आधारित उदारवादी विचारसरणी पुढे आली. या विचारसरणीने जीवित स्वातंत्र्य आणि संपत्तीचा अधिकाराला नैसर्गिक अधिकार म्हणून मान्यता दिली आणि प्रत्येक व्यक्तीला कोणत्याही संकुचित मूल्याच्या आधारे भेदभाव न करता हे अधिकार दिले जावे हा विचार मांडला. अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धाने मानवी हक्काचा जाहीरनामा दिला तर फ्रान्सच्या राज्यक्रांतीने स्वातंत्र्य,समताव बंधुता ही लोकशाही मूल्यांची mqllyanchi त्रिसूत्री मांडली. त्यामुळे नागरीक्त्वाला एक नवीन अर्थ प्राप्त झाला. परंतु अनेक देशातील स्त्रिया नागरिकत्वाच्या कक्षेबाहेरच राहिल्या. परिणामी आपल्या मताधिकारासाठी स्त्रियांना संघर्षाचा मार्ग स्वीकारावा लागला.

जगातील इतिहासाचा आढावा घेतला तर संपूर्ण इतिहास पुरुष केंद्रित झालेला दिसून येतो. राजकारणात पुरुषांची मक्तेदारी ही सुरुवातीपासूनच राहिलेली आहे. प्राचीन ग्रीक विचारवंत प्लेटोने मात्र आदर्श राज्याच्या निर्मितीत स्त्रियांना समान दर्जा दिला होता. त्याने कुटुंब व स्त्रियांच्या साम्यवादाची संकल्पना मांडून स्त्रियांना पुरुषाच्या बरोबरीचे स्थान दिले. ॲरिस्ट्रॉटल नेसूद्धा स्त्रियांच्या संदर्भात विचार मांडले आहेत. परंतु त्याने स्त्रियांना सामान दर्जा न देता त्यांचे कार्यक्षेत्र घरकामापुरतेच मर्यादित ठेवले. मध्ययुगात स्त्रियांना कोणतेच स्थान नव्हते. एक उपभोग्य वस्तू म्हणून स्त्रियांकडे पहिले जात असे. स्त्रियांना घराच्या चार भिंतीआड डांबून ठेवण्याची परंपरा या काळात सर्वत्र दिसून येत होती. सामाजिक व राजकीय जीवनात स्त्रियांच्या वाट्याला कोणतीही भूमिका आलेली नव्हती. मध्ययुगानंतर चर्चच्या सत्तेचा ऱ्हास झाला आणि सर्वत्र राष्ट्रराज्ये आणि त्यातून राजेशाही निर्माण झाली. राजेशाहीत स्त्रियांना विशेष स्थान नसायचे. इंग्लंडसारख्या काही देशात वारसा हक्कामध्ये स्त्रियांना स्थान देण्यात आलेले होते. मात्र त्याचा फारसा प्रभाव स्त्रियांच्या भागीदारीवर दिसून येत नसे. औद्योगिक क्रांतीनंतर पाश्चात्य समाजाचे स्वरूप मोठ्या प्रमाणावर बदलू लागले. शिक्षणाचा प्रसार आणि नवीन विचारांनी स्त्रियांमध्ये जागृती येऊ लागली. फ्रांन्सच्या राज्याक्रांतीनंतर लोकशाही आणि तिच्या अनुषंगाने समता, स्वातंत्र्य व बंधुभावाच्या तत्वांना चालना मिळाली. परिणामी स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे हक्क व दर्जा देण्यात यावा आणि राजकारणातील त्यांची भागीदारी निश्चित करावी हा विचार जोर धरू लागला. म्हणजेच राजकीय क्षेत्रातील स्त्रियांची भागीदारी १९ व्या शतकानंतरच दिसू लागली. निरनिराळ्या देशातील सामाजिक,आर्थिक व राजकीय व्यवस्थेत स्त्रियांचे स्थान व भूमिका यावरून स्त्रियांच्या भागीदारीची कल्पना येते.

**इंग्लंडमधील स्त्रियांचे स्थान व भूमिका**

इंग्लंडच्या सामाजिक व्यवस्थेत लिंगाच्या आधारे कोणताही भेदभाव केला जात नाही. स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने राजकीय व वैधानिक अधिकार देण्यात आले आहेत. परंतु हे अधिकार स्त्रियांना सहजासहजी मिळाले नाहीत. त्यासाठी स्त्रियांना संघर्ष करावा लागला. मताधिकारासाठी ब्रिटिश स्त्रियांनी केलेल्या आंदोलनातून इतरही युरोपीय राष्ट्रातील स्त्रियांना नवी दिशा मिळाली. राजकीय क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने मताधिकार मिळविण्यासाठी ब्रिटिश स्त्रियांना १९२८ पर्यंत वाट पाहावी लागली. फ्रांसमध्ये १९४४ पर्यंत तर स्वित्झर्लंडमध्ये १९७१ पर्यंत स्त्रियांना मताधिकार मिळाला नव्हता. या दृष्टीने विचार केल्यास स्त्रियांना राजकीय अधिकार देण्याच्या बाबतीत इंग्लंडने आघाडी घेतली होती. मताधिकारातून स्त्रीयांचा राजकीय क्षेत्रात शिरकाव झाला आणि विधिमंडळाचे सदस्य, मंत्री व इतर राजकीय पदे स्त्रियांना मिळू लागली. पंतप्रधानपदसुद्धा इंग्लंडमध्ये स्त्रियांनी उपभोगले आहे.

**अमेरिकेतील स्त्रियांचे स्थान व भूमिका**

१९ व्या शतकात अमेरिकन स्त्रीयांनी सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने स्थान प्राप्त करण्यास यश मिळविले. परंतु आजतागायत कोणतीही स्त्री अमेरिकेचे अध्यक्ष पद भूषवू शकली नाही हे अमेरिकेच्या समाजजीवनाचे वास्तव आहे. मात्र इतर क्षेत्रात स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने अधिकार उपभोगत आहेत. आधुनिक काळात अमेरिकन स्त्री आपल्या इच्छेनुसार वैधानिक, न्यायिक, प्रशासकीय, वैद्यकीय इ. कोणत्याही क्षेत्रात पुढे जाऊ शकते. मागील ५० वर्षात स्त्रियांनी राजकारणात भाग घ्यायला सुद्धा सुरुवात केली आहे. गेल्या ६० वर्षात १०० स्त्रिया केंद्रीय विधीमंडळामध्ये निवडून आल्या आहेत. ५ स्त्रिया आपापल्या राज्यात गव्हर्नर राहिल्या आहेत. तर ६ स्त्रियांनी अध्यक्षाच्या मंत्रीमंडळातही कार्य केले आहे. १९९३ मध्ये अमेरिकन काँग्रेसच्या प्रतिनिधीगृहात २१ तर सिनेटमध्ये २ स्त्रिया सदस्य म्हणून निवडून आल्या होत्या. शिवाय निरनिराळ्या राज्यातील विधिमंडळात एकूण ८५० स्त्रिया सदस्य होत्या. १९९६ मध्ये या संख्येत वाढ होऊन प्रतिनिधीगृहात ५१ तर सिनेटमध्ये ९ स्त्रिया निवडून आल्या. अमेरिकेच्या राजकीय व्यवस्थेत स्त्रियांचे महत्वपूर्ण योगदान आहे. परंतु एक विकसित राष्ट्र असूनही पुरुष आणि स्त्रियांना समान उत्पन्न मिळत नाही. हे माजी अध्यक्ष बिल क्लिंटन यांनी स्वतः कबूल केले आहे. १९२० मध्ये अमेरिकेच्या राज्यघटनेत केल्या गेलेली १९ वि दुरुस्ती स्त्रियांना समान राजकीय अधिकार प्रदान करणारी ठरली. या दुरुस्तीनुसार स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने मताधिकार देण्यात आला. वैधानिक दृष्टीने स्त्रियांना समान दर्जा देण्यासाठी १९७२ मध्ये आणखी एक घटना दुरुस्ती करण्यात आली होती परंतु तिला तीन चथुर्थांश घटक राज्यांची मंजुरी मिळू शकली नाही. असे असले तरी ही घटनादुरुस्ती व्हावी असे प्रयत्न सुरु आहेत. वैधानिक क्षेत्रात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचा दर्जा देण्यात आलेला नसला तरी राजकीय व सामाजिक जीवनात त्याचे महत्वाचे योगदान आहे.

**चीनमधील स्त्रियांचे स्थान व भूमिका**

चीनची संस्कृती अतिशय प्राचीन असून भारताप्रमाणे चीनच्या संस्कृतीमध्ये स्त्रियांची परिस्थिती समाधानकारक नव्हती. चीनच्या पुरुषप्रधान व्यवस्थेत स्त्रियांना दुय्यम दर्जा देण्यात आला होता. स्त्रियांना पुरुषांच्या आधीन राहावे लागे. सार्वजनिक व राजकीय जीवनात स्त्रियांना स्थान नव्हते. परावलंबी जीवनच त्यांच्या वाट्याला आले होते. मात्र १९४९ च्या साम्यवादी क्रांतीनंतर हे चित्र पालटले. क्रांतीने स्त्रियांच्या जीवनात आमुलाग्र बदल घडवून आणला. माओच्या साम्यवादी पक्षाच्या नेतृत्वाखाली स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान देण्यात आले. चीनच्या संविधानातील कलम ४८ मध्ये स्त्रियांच्या समान हक्कांची तरतूद करण्यात आली. कायद्यासमोर समानतेचे तत्वही स्वीकारण्यात आले. स्त्रियांसाठी सर्व क्षेत्रे खुली करण्यात आली. स्त्रियांचे आर्थिक सबलीकरण, सक्षमीकरण, सामाजिक दर्जा सुधारणे, विवाह, घटस्फोट, वारसा हक्क इ. संदर्भात अनेक कायदे करण्यात आले. सार्वजनिक शिक्षणाची व्यवस्था करण्यात आली आणि स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने स्थान मिळू शकेल अशी परिस्थिती निर्माण करण्यात चीनचे सरकार यशस्वी ठरले.

साम्यवादी क्रांतीनंतर चीनमधील स्त्रियांच्या जीवनात क्रांतिकारी बदल घडवून त्यांच्या सामाजिक दर्जा बदलला परंतु हे सर्व बदल साम्यवादी सिद्धांताच्या अधीन राहून केले गेल्यामुळे स्त्रियांना वैचारिक स्वातंत्र्य नाकारण्यात आले. त्यामुळे चीनमधील स्त्रियांचा राजकीय विकास हा एकांगी स्वरूपाचा आहे असे म्हणवे लागेल.

**स्वित्झर्लंडमधील स्त्रियांचे स्थान व भूमिका**

प्रत्यक्ष लोकशाही राबविणारा जगातील एकमेव देश अशा शब्दात स्वित्झर्लंडच्या राजकीय व्यवस्थेचे वर्णन करण्यात येत असले तरी तेथे स्त्रियांच्या राजकीय अधिकाराबाबत अनुदार दृष्टिकोन स्वीकारला जातो. ही बाब तेथील राजकीय व्यवस्थेशी विसंगत ठरणारी आहे. युरोपीय राष्ट्रामधून मताधिकाराच्या मागणीसाठी स्त्रियांनी आंदोलने सुरु केली आणि बऱ्याच देशातील स्त्रियांना त्यात यश मिळाले. मात्र स्वित्झर्लंडमध्ये त्या चळवळी पोहचू शकल्या नाहीत. तेथील राजकीय संस्कृती,राजकीय समज, समायोजनाची प्रवृत्ती आणि आपल्या राजकीय परंपरेवर असणारा विश्वास इ. कारणामुळे तेथील स्त्रियांनी राजकीय अधिकारांच्या मागणीसाठी उग्र आंदोलने केली नाहीत. असे असले तरी १९५० च्या दशकात या मागणीला जोर चढला परंतु स्वित्झर्लंडमधील

स्त्रियांना मताधिकार मिळविण्यासाठी १९७१ पर्यंत वाट पाहावी लागली. स्वित्झर्लंडमध्ये स्त्रियांना मताधिकार आणि राजकीय क्षेत्रात सहभागी होण्याची संधी देण्यात आली तरी राजकीय प्रक्रियेतील स्त्रियांची सक्रियता विशेषत्वाने जाणवत नाही. तेथील लोकांचा स्वभाव त्यासाठी कारणीभूत ठरलेला आहे. राजकारण हे पुरुषांचे क्षेत्र आहे असे आजही तेथे मानले जाते. परिणामी प्रत्यक्ष लोकशाही असूनही राजकारणातील स्त्रियांचा सहभाग विशेष महत्वाचा ठरत नाही.

**भारतामधील स्त्रियांचे स्थान व भूमिका**

भारत स्वतंत्र झाल्यानंतर भारतीय नागरिकांच्या सर्वांगीण विकासासाठी व लोकतंत्रात्मक एकात्म शासन व्यवसतेला मजबूत करण्यासाठी तत्कालीन नेत्यांनी लिखित संविधानाची निर्मिती केली. त्यात त्यांनी समाजातील शोषित, पिडीत व उपेक्षित वर्गाच्या विकासाच्या दृष्टिकोनातून कार्यक्रम राबविण्याच्या दृष्टीने संविधानाद्वारे तरतूदी करण्यावर भर दिला आहे. प्राचीन काळापासून उपेक्षित व शोषित राहिलेल्या स्त्रियांच्या विकासासाठी पुरुषांच्या बरोबरीचे अधिकार प्रदान केले. संविधानात मूलभूत अधिकार व मार्गदर्शक तत्वे या माध्यमातून स्त्रियांच्या सर्वांगीण विकासासाठी, उन्नतीसाठी संधी व दर्जा प्रदान करण्यात आला. घटकराज्यांनी मार्गदर्शक तत्वांना समोर ठेऊन महिलांच्या विकासासाठी कायदे करावे असे सुचविण्यात आले. याचे श्रेय स्वातंत्रपूर्वकाळातील स्त्रियांच्या विकासासाठी तत्कालीन समाजसुधारक म. फुले, आगरकर, महर्षी कर्वे, शाहू महाराज डॉ. आंबेडकर आदी समाजसुधारकांना जाते. त्यांच्या प्रयत्नामुळेच समाजाचा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन हळूहळू बदलू लागला. साविधानानुसार आज देशातील विविध घटकराज्य सरकारे व केंद्रसरकार यांनी स्त्रियांना विशेष सवलती देण्यास सुरुवात केली. संविधानाच्या कलम २४३ (घ) (३) व २४३ (न) (३) नुसार प्रत्येक पंचायत तसेच नगरपालिकामध्ये प्रत्यक्ष निर्वाचित सभासदांच्या एकूण संख्येमध्ये एक तृतीयांश स्थान अनुसूचित जाती व जनजाती स्त्रियांसाठी आरक्षित आहे. अशारीतीने भारतीय संविधानात आर्थिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात महिलांना पुरुषांच्या बरोबरीने अधिकार प्रदान करण्यात आले आहे. याचबरोबर हे देखील मान्य करण्यात आले आहे कि, जो वर्ग शतकापासून शोषित व उपेक्षित होता, त्या समाजातील स्त्रियांच्या विकासावर विशेष लक्ष देणे राज्याचे कर्तव्य आहे. संविधानाच्या कलमांचा विचार करून महिलांना पुरुषाच्या बरोबरीने अधिकार प्रदान करण्यात आणि महिलांना मताधिकार देण्यात भारताने जगात अग्रक्रम पटकाविला आहे.

भारतीय संविधानात लोकप्रतिनिधीत्व कायदा आणि पंचायती कायदा यानुसार १९५२ मधील प्रथम सार्वत्रिक निवडणूकिपासूनच महिला प्रत्यक्ष राजकीय प्रक्रियेत सहभागी होत आहेत. मात्र स्थानिक व सांसदीय निवडणुकीतील महिलांच्या सहभागाबाबत विचार केल्यास त्यांचे निवडणुकीतील योगदान काहीसे निराशाजनक राहिले. ज्या महिला संसदेवर निवडून आल्यात त्यामध्ये त्यांच्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव कमी राहून वडील किंवा पती यांच्या मर्जीवर व त्यांच्याच प्रभावाखाली त्या कार्य करीत असल्याचे आढळून आले. महिलांचा संसदेतील सक्रिय सहभाग लक्षात घेता काही महिलांचा उल्लेख करने अत्यंत महत्वाचे आहे. उदा. इंदिरा गांधी,सुचेता कृपलानी, विजयालक्ष्मी पंडित, नंदिनी सत्पथी, तारकेश्वरी सिन्हा, मृणाल गोरे, प्रमिला दंडवते, जयललिता, मोहसीना किडवई, राजेंद्रकुमारी बाजपेयी, नजमा हेपतुल्ला, उमा भारती, ममता बॅनर्जी, सुषमा स्वराज, विजयाराजे सिंधीया, मार्गारेट अल्वा, मायावती आदी महिलांनी आपल्या व्यतिकमत्वाची छाप संसदेवर आणि विधिमंडळावर टाकलेली दिसते. ७३ व्या घटनादुरुस्तीनुसार मात्र खऱ्या अर्थाने (१) ग्रामीण भागातील स्त्रियांना राजकारणात उमेदवारी मिळाली. (२) ग्रामीण महिलांना निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत सहभागी होता आले, त्यांना निर्णय प्रक्रियेत अधिकार प्राप्त झाला. (३) स्त्रियांच्या वाढत्या सहभागामुळे राजकारणातील स्त्री - पुरुष यांच्यातीळ सत्तेची समीकरणे बदललीत व निर्णय प्रकियेतील त्यांचा आत्मविश्वास वाढला. त्यामुळे महिलांना आज स्वविकासाच्या दृष्टीने अनुकूल वातावरण निर्माण झालेले असून ग्रामीण महिलाही राजकारणाच्या क्षेत्रात सक्रीय होऊ लागल्या आहेत. हे भारतातील लोकशाही प्रक्रियेचे यश मानावे लागते.

**संदर्भसूची:-**

(१) तुलनात्मक शासन आणि राजकारण – प्रा. शेख हाशम, डॉ. जोगेंद्र गवई, विश्व पब्लिशर्स अँड डिस्ट्रिब्युटर्स , नागपूर.
(२) भारतीय लोकशाही प्रक्रिया:- डॉ. अलका देशमुख, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.
(३) भारतातील स्थानिक स्वशासन:- रा. ज. लोटे अँड कं. पब्लिशर्स नागपूर.
(४) भारतीय लोकशाही:- डॉ. संजय गोरे, डॉ. मधुकर अर्जुनकर श्री. साईनाथ प्रकाशन धरमपेठ, नागपूर.